संकल्पचित्र तयार करताना
घ्यावयाची खबरदारी.

कार्य दावी (३)
सर्व कार्य ना प्रत यावी
सर्वांनी शाखेला सूचनांची
नोंद घेऊन पोच यावी

महाराष्ट्र शासन,
पाटबंधारे विभाग,
परिपत्रक क्र. संकीर्ण १०९९/[२०९/९९]
मोप्र [प्र].
दिनांक:- 16 फेब्रुवारी, २०००.

परिपत्रक:-

लोकलेखा समितीपुढे एका प्रकरणात सचिव [पा] यांची साक्ष आयोजित करण्यात आली होती. सदर साक्षीच्या अनुषंगाने लोकलेखा समितीकडून खालीलप्रमाणे शिफारस प्राप्त झाली आहे.

" जलसेतुचे बांधकाम १९८३-८४ मध्ये सुरु होवूनही ते पूर्ण करण्यास जवळपास [८] वर्षांचा प्रदीर्घ कालावधी लागला केवळ जलसेतुचे बांधकामाच्या संकल्पचित्रा विषयी घोळ घालण्यातच संकल्पचित्रामध्ये ॲप्रोच पॉईटचा समावेश नाशिकच्या महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेकडून करुन घेण्यासाठी मुख्यत्वेकरुन हा विलंब लागलेला आहे. मूळ संकल्पचित्र तयार करतानाच नंतर केले गेलेले योग्य संकल्पचित्र तयार करणे सहज शक्य होते परंतु अधिकाऱ्यांच्या अविवेकीपणामुळे हा सर्व घोळ निर्माण झाला असे म्हटल्यास ते वावगे ठरु नये निदान यापुढे तरी एखादया कामाचे संकल्पचित्र तयार करताना सर्व बाजूने सारासार विचार करुन विवेकीपणाने संकल्पचित्र तयार करण्यासंबंधात खबरदारी घेण्याविषयी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना विभागाने योग्य त्या सूचना दयाव्यात अशी समितीची शिफारस आहे "

२. लोकलेखा समितीच्या उपरोक्त शिफारशीप्रमाणे संकल्पचित्र तयार करण्यासाठी अधिक विलंब लागणाऱ्या घटनेची पुनरावृत्ती यापुढे होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी तसेच यापुढे एखादया कामाचे संकल्पचित्र तयार करताना सर्व बाजूने सारासार विचार करुन संकल्पचित्र तयार करण्याची खबरदारी घेण्यात यावी असे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेच्या सर्व अधीक्षक अभियंता व संचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था तसेच मुख्य अभियंत्यांच्या अधिनस्थाखालील कार्यरत असलेल्या संकल्पचित्र विभागांच्या

EX. ENGINEER DESIGNS DIVISION, C. S. I. C. D. O., NASIK. Inward No. 909 Date 8/3/2000

960 26/2/2000

[ कृ. मा. पा. ]

कार्यकारी अभियंत्यांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे, संकल्पचित्र तयार करण्यासाठी विलंब झाल्याने काम रखडल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल याचीही नोंद घेण्यात यावी.

३. उपरोक्त सूचना आपल्या अधिपत्याखालील कार्यकारी अभियंता व मुख्य अभियंता यांचेही निदर्शनास आणून त्यांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत कळविण्यात यावे.

नोंद घेणेसाठी
१) द. अ. गिरे, अभि.
२) द. नि. डोळे —
३) ना. ले. —
४) म. ह. —

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

[ पु. अ. कुलकर्णी ]
शासनाच्या अवर सचिव.

प्रत,

सचिव, [ पा ],पाटबंधारे विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
सचिव.[ लाक्षेवि ],पाटबंधारे विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
मुख्य अभियंता व सह सचिव,
कार्यकारी संचालक,महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे.
कार्यकारी संचालक,विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर.
कार्यकारी संचालक,तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव.
कार्यकारी संचालक,कोकण पाटबंधारे विकास महामंडळ,रत्नागिरी.
कार्यकारी संचालक,गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.

सर्व तांत्रिक अधिकारी पाटबंधारे विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
सर्व क्षेत्रिय मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता,पाटबंधारे विभाग,
निवड [प्र],संग्रहार्थ.

जा.क्र. मसंसं/दववि३/परि./६२

कार्यकारी अभियंता
संकल्पचित्र विभाग(दववि३)
नाशिक
दि. ९/३/२०००

श्रीम. कदम/स्टे.
१४. ३. २०००.

प्रत कार्यकारी अभियंता
संकल्पचित्र विभाग।
दववि१/दववि२/दववि४/का.वा/प्रआ.३
म.सं.स. नाशिक
यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

कार्य. अभि.
संकल्पचित्र विभाग दववि३
म.सं.सं. नाशिक